महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०१८

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमधील शिक्षकांना मतदार याद्या अद्ययावत करण्याचे काम देण्यात आल्याबाबत

(१) २२८२२ (१०-०८-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) या तालुक्यातील शिक्षकांचे बी.एल.ओ. आदेश रद्द करण्यासाठी प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने एक दिवसाचे धरणे आंदोलन करण्यात आल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच आरटीई ॲक्ट २००९ अन्वये शिक्षकांना अशैक्षणिक कामे देता येत नाही, असे असतांनाही नागपूर जिल्हयातील महसूल विभागाने प्राथमिक व माध्य.शाळामधील शिक्षकांना मतदारांना आधार कार्डाशी जोडण्याचे तसेच ऐन परिक्षा व उजळणीच्या काळात निवडणुकाशी संबंधित मतदार यादया अद्ययावत करण्याचे काम देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (२) बाबत शिक्षक संघाचे जिल्हा अध्यक्ष यांनी यासंदर्भात उपविभागीय अधिकाऱ्यांना एक लेखी निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०९-०५-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ चे कलम २७ नुसार दशवार्षिक जनगणना, नैसर्गिक आपत्ती निवारण कार्य व स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा व लोकसभा निवडणूक प्रक्रियेशी निगडीत सर्व कामे शिक्षकांना करणे बंधनकारक आहे. इतर शाळाबाहय प्रयोजनार्थ शिक्षकांच्या सेवा देण्यास प्रतिबंध आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रीकरण व साक्षरता कार्यक्रमाची अंबलबजावणी करण्याबाबत

(२) २८६१५ (०६-०४-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रीकरण व साक्षरता यासाठी कृती कार्यक्रमाची अंबलबजावणी रहावी म्हणून राज्यात ४ हजार ८६० केंद्रीय प्राथमिक शाळांची स्थापना १० जिल्हा परिषद शाळांसाठी एक या प्रमाणात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास राज्यातील जिल्हा परिषद आस्थापनेवरील १०४८ केंद्र प्रमुखांची पदे रिक्त आहेत तसेच विस्तार संवर्गातील ५०१ पदे रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०९-०५-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) केंद्र प्रमुखांची रिक्त पदे सरळसेवा, विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षा तसेच पदोन्नतीने भरण्याबाबत दि.१६/०२/२०१८ च्या शासन निर्णयानुसार सुधारित कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. विस्तार अधिकारी (शिक्षण) या पदाची राज्यातील जिल्हा परिषदांची पदभरती मागील दोन वर्षापासून झालेली नाही. आता सदरची पदभरती ग्राम विकास विभागामार्फत होत असून ही भरती वित्त विभागाने दिलेल्या आदेशानुसार मंजूर पदाच्या ४% वा भरतीसाठी उपलब्ध असलेल्या रिक्त पदांपैकी ५० % जी कमी असतील ती पदे भरावयाची आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक साहित्याच्या किंमतीत झालेल्या वाढीबाबत

(३) ५३९३३ (२२-८-२०१६). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील गत वर्षाच्या तुलनेत विद्यार्थ्यांचे दप्तर, शैक्षणिक साहित्य, गणवेश अशा सा-याच साहित्यांच्या किंमतीत वाढ झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत वर्षी ज्या गणवेशासाठी ५०० रुपये खर्च होता त्या गणवेशासाठी आता ८०० रुपये खर्च होत असून शाळा व दुकानदार यांचे संगनमत असल्याने पालकांना ठराविक दुकानदार कडून गणवेश खरेदी करावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशाप्रकारे शैक्षणिक साहित्य तसेच शाळांच्या मनमानीवर नियंत्रण ठेवण्याकरिता शासन कोणत्या उपायोजना करणार वा करित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१४-०५-२०१८) : (१) अंशत: हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य शाळांकडून अथवा शाळांनी ठरवून दिलेल्या दुकानातून खरेदी करण्याची सक्ती न करण्याबाबत शासनाच्या दि. ११/०६/२००४ च्या शासन निर्णयान्वये सूचना दिलेल्या आहेत. तथापि, अशा सूचनांचे पालन न करण्याऱ्या शाळांच्या अनुदानात कपात करणे / अनुदान बंद करणे, शाळांची मान्यता रद्द करणे, शाळांना देण्यात आलेले "ना - हरकत प्रमाणपत्र" रद्द करणे इ. प्रकारची कार्यवाही विभागीय शिक्षण उपसंचालकांमार्फत करण्याबाबत सदर शासन निर्णयात तरतुद करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईमधील नामांकित शाळा त्यांच्या परिसरामध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारीत असल्याबाबत

(४) ८११२६ (२०-०४-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमध्ये अनेक छोट्या मोठ्या नामांकित शाळा त्यांच्या परिसरामध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारत असून लांबच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देत असल्याच्या अनेक घटना निदर्शनास आल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत अनेक तक्रारी शालेय शिक्षण विभागाकडे दाखल झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शाळांच्या परिसरातील विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्य द्यावे व बाहेरील विद्यार्थ्यांना नंतर प्रवेश द्यावा याबाबत कठोर नियम नियमावली बनवून त्याची अंमलबजावणी करण्याकरिता तसेच संपूर्ण प्रवेश यादी पत्त्यासहित शाळेच्या नोटीस बोर्ड वर लावावी याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

श्री. विनोद तावडे (०५-०५-२०१८) : (१) व (२) हे खरे नाही.
(३) शासन निर्णय दिनांक २८/०५/२००३ अन्वये प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची नावे सूचना फलकावर लावण्याबाबत तरतूद आहे व त्याची अंमलबजावणी शाळा व्यवस्थापनास करणे बंधनकारक आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पालघर जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी या पालघर आदिवासी विभागातील शिक्षकांना आर्थिक गैरव्यवहार करायला भाग पाडत असल्याबाबत

(५) ८२१४८ (२०-०४-२०१७). श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी श्रीमती संगीता भागवत या पालघर आदिवासी विभागातील शिक्षकांना दमदाटी करून आर्थिक गैरव्यवहार करायला भाग पाडत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार शिक्षकांना त्रास देऊन व दमदाटी करून कामात मदत न करता आर्थिक गैरव्यवहार करण्यास भाग पडणाऱ्या पालघर शिक्षणाधिकारी यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१०-१०-२०१७) : (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

येवला व निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील ३१४ जिल्हा परिषद शाळा डीजीटल करण्याबाबत

(६) ८६२८३ (२३-०८-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.छगन भुजबळ (येवला) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला व निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील ३१४ जिल्हा परिषद शाळा डीजीटल करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी नाशिक जिल्हा परिषदेकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे काय,

(३) असल्यास, लोकप्रतिनिधींनी मागणी करुनही सदर मागणीवर कार्यवाही न केल्याप्रकरणी शासनाने संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

श्री. विनोद तावडे (२०-०४-२०१८) : (१) होय.

(२) सदर प्रकरणी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प नाशिक या कार्यालयाच्या दि. २ जून, २०१७ च्या पत्रान्वये जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या कार्यालयास, सदर जिल्हा परिषद शाळांसाठी अनुदान उपलब्ध करणेबाबत कार्यवाही होणेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

(३) येवला गटातील एकूण २३६ जिल्हा परिषद शाळांपैकी, २३२ शाळा डिजिटलायजेशन झालेल्या आहेत व उर्वरित ४ शाळा समाज सहाभागातून गट शिक्षणाधिकारी (तालुका) स्तरावर प्रस्तावित आहेत.

तसेच, निफाड गटातील एकूण २३५ जिल्हा परिषद शाळांपैकी, २०७ शाळा डिजिटलायजेशन झालेल्या आहेत व उर्वरित प्रलंबित शाळांपैकी, २८ शाळा समाज सहाभागातून गट शिक्षणाधिकारी (तालुका) स्तरावर प्रस्तावित आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

तीन वर्षाचा शिक्षण सेवक पदाचा कालावधी पूर्ण करणाऱ्या शिक्षकांना कायम करुन नियमित वेतनश्रेणी देण्याबाबत

(७) ९५२७८ (२९-१२-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तीन वर्षाचा शिक्षण सेवक पदाचा कालावधी पूर्ण करणा-या शिक्षकांना कायम करुन नियमित वेतनश्रेणी देण्याचा निर्णय मुंबई विभागीय शिक्षण उपसंचालकांनी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिक्षकांना कायम केल्यानंतर नियमित वेतनश्रेणी देण्यास लेखा अधिकाऱ्यांकडून विलंब होत असल्याबाबतच्या तक्रारी शिक्षक परिषदेने शिक्षण उपसंचालकांकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने शिक्षण उपसंचालकांचा निर्णय व लेखा अधिकाऱ्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली तसेच कार्यवाहीबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (११-०५-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील के.जी. सोमैया या महाविद्यालयात मराठीचे पद रिक्त करण्यात आल्याबाबत

(८) ९५८३६ (३०-१२-२०१७). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्याविहार येथील, के.जे. सोमय्या महविद्यालयात, सुधारित संच मान्यता असूनही केवळ मराठीद्वेषापायी तसेच मराठी विषयासाठी, दोन शिक्षकांची पदे मंजूर असतानाही एका पदाचा कार्यभार कमी असल्याचे भासहून या पदावर काम करणा-या शिक्षिकेला, शिक्षण सेवक कालावधी पूर्ण व्हायच्या पंधरा दिवस आधीच महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी दिनांक १८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास सेवेतून कमी केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महाविद्यालयाने विदेशी भाषांना परवानगी नसतानाही फ्रेंच, जर्मनी, जपान, आदि भाषांसाठी विद्यार्थांना प्रवेश दिला असून, प्राचार्यांनी, स्वतः वर्गात जावून, मराठी विषय घेऊ नयेत यासाठी, दबाव टाकत असल्याचा आरोप कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाने केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदरहू महाविद्यालयातील प्राचार्यां विरुध्द, कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१५-०५-२०१८) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईसह राज्यातील प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे दोन महिन्यांचे वेतन "सेवार्थ" या संगणक प्रणालीतील तांत्रिंक अडचणीमुळे थकित असल्याबाबत

(९) १००६११ (०५-०१-२०१८). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील महाविद्यालयीन प्राध्यापक व कर्मचारी यांना गत २ वर्षापासून वेतन अदा करण्यात येणाऱ्या सेवार्थ प्रणालीच्या कंपनीशी असलेल्या करारामध्ये तांत्रिक अडचण असल्याने सेवार्थ प्रणाली बंद पडल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २१ ऑगस्ट, २०१७ पासून उक्त प्रणाली बंद पडल्याने राज्यातील सर्व शासकीय कर्मचारी, महाविद्यालयीन व शालेय शिक्षक, तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांचे माहे ऑगस्ट व सप्टेंबर, २०१७ या दोन महिन्याचे वेतन अदा करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संगणक प्रणालीतील तांत्रिक अडचणी दुर करुन थकीत असलेले वेतन तात्काळ मिळावे अशी मागणी मुप्टा संघटनेने उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे दिनांक ०५ ऑक्टोंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०८-०५-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) प्रश्नाधीन प्रकरणी माहे ऑगस्ट व सप्टेंबर, २०१७ या दोन महिन्यांचे वेतन अदा करण्यात आले नाही हे खरे नाही.

तथापि, सेवार्थ प्रणालीमध्ये आलेल्या तांत्रिक अडचणीमुळे या दोन महिन्यांचे वेतन उशिराने अदा करण्यात आले.

(३) प्रश्नाधीन लेखी निवेदन विभागाकडे आल्याचे आढळून आले नाही.

(४) प्रश्नाधीन प्रकरणी उद्भवलेली तांत्रिक अडचण दूर करुन सेवार्थ प्रणाली पूर्ववत सुरु करण्यात आली असून कर्मचा-यांचे प्रलंबित वेतन अदा करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या १०० शाळा उभारण्याबाबत

(१०) १०२१८९ (२९-१२-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या १०० शाळा उभारण्याचा निर्णय घेण्यात आलेला असून त्यासाठी केंब्रिज विद्यापीठ व ब्रिटीश कौन्सिलची मदत घेण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी किती निधीची आवश्यकता आहे व सदर निधी कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२०-०४-२०१८) : (१) अंशत: खरे आहे.

आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शाळा निर्माण करण्यासाठी केम्ब्रिज विद्यापिठाच्या मदतीने Gap Analysis करण्यात आला आहे.

(२) या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी येणारा खर्च CSR, लोकसहभाग, सर्व शिक्षा अभियान (SSA) / राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान (RMSA) मधून करण्यात येईल.

(३) राज्यात आंतरराष्ट्रीय शैक्षणिक दर्जाच्या शाळा निर्माण करण्यासाठी शासन निर्णय दिनांक ३० नोव्हेंबर, २०१७ अन्वये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शाळा निर्मितीचे निकष निश्चित करण्यात आले आहेत.

आंतरराष्ट्रीय शाळांमध्ये होणारे अध्ययन - अध्यापन आंतरराष्ट्रीय मानकांप्रमाणे असणे आवश्यक असून, याकरिता शैक्षणिक दृष्ट्या पुरेसे स्वातंत्र्य व स्वायतत्ता मिळणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर राज्यात या शाळांच्या संलग्नतेकरिता महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शाळा मंडळ असे नवीन बोर्ड स्थापन करण्याचा निर्णय दिनांक २ जानेवारी, २०१८ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. या महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शाळा मंडळांतर्गत विविध समित्या स्थापन करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापुर येथील शिवाजी विद्यापीठातील विविध स्तरावरील भरती प्रक्रियेत झालेल्या गैरव्यवहाबाबत

(११) १०२३६४ (२९-१२-२०१७). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापुर येथील शिवाजी विद्यापीठातील सन २०१० ते १५ या कालावधीत विविध स्तरावरील भरती प्रक्रियेत झालेल्या गैरव्यवहाराचा चौकशी अहवाल विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक, सोलापुर यांच्या एक सदस्यीय समितीने नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान संचालक उच्चशिक्षण पुणे यांना सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवालाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०७-०५-२०१८) : (१) हे अंशत: खरे आहे.

प्रश्नात नमूद प्रकरणाचा अहवाल विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांनी माहे जानेवारी, २०१७ मध्ये संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना सादर केला आहे.

(२) होय.

(३) मा.राज्यपाल तथा कुलपती यांच्या सूचनेनुसार तत्कालीन कुलसचिव, डॉ. डी.व्ही.मुळे यांच्या कार्यकाळात झालेल्या भरतीची चौकशी करण्यासाठी विद्यापीठाने सेवानिवृत्त न्यायाधीश श्री. शानभाग समिती नियुक्त केलेली आहे. सदर समिती कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ यांना अहवाल सादर करणार असून त्यानंतर सदर अहवाल मा. राज्यपालांना सादर करण्यात येणार आहे. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांच्या समितीचा प्राप्त अहवाल सेवानिवृत्ती न्यायाधीश श्री.शानभाग समितीसमोर ठेवण्याची कार्यवाही करण्याबाबत संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना दि. ०६.०९.२०१७ च्या शासन पत्रान्वये कळविले आहे. त्यानुषंगाने श्री.शानभाग समितीने विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांच्या समितीचा अहवाल विचारात घेऊन कामकाज पूर्ण करून दि.३०.१२.२०१७ रोजी विद्यापीठास अहवाल सादर केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही विद्यापीठ स्तरावर सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

महाराष्ट्र राज्य अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहाव्या वेतन आयोगातील वेतन त्रुटी दूर करण्याबाबत

(१२) १०२४४३ (२९-१२-२०१७). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सहाव्या वेतन आयोगातील वेतन त्रुटी दूर करुन शिक्षेत्तर कर्मचा-यांना न्याय देण्यात यावा अशी मागणी उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २३ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार अशासकिय महाविद्यालयातील शिक्षकेत्तर पदांच्या वेतन त्रुटी बाबतच्या प्रस्तावावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०७-०५-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.

(२) अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकेतर पदांच्या वेतनत्रुटीबाबतचा प्रस्ताव निर्णयासाठी वरिष्ठ स्तरावर सादर करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शाळांमध्ये परिवहन सुरक्षा समिती स्थापन करणे बंधनकारक असल्याबाबत

(१३) १०२९९३ (२९-१२-२०१७). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये स्कुल बस नियम, २०११ अन्वये शाळांमध्ये परिवहन सुरक्षा समिती स्थापन करणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात स्कुल बस नियम, २०११ ची प्रभावी अंमलबजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यास किती कालावधी लागणार आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर नियमांची प्रभावी अंमलबजावणी न करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०७-०५-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठाचे ऑनलाईन मुल्याकंनाचे काम पूर्ण करणाऱ्या प्राध्यापकांना अतिरिक्त मानधन मिळाले नसल्याबाबत

(१४) १०३०१२ (२९-१२-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या ऑनलाईन मुल्याकंनाचे काम वेगाने पूर्ण करण्यासाठी प्राध्यापकांना अतिरिक्त डीए आणि इतर लाभ देण्याची घोषणा विद्यापीठाने केलेली असूनही दोन महिने उलटूनही उक्त काम काम पूर्ण करणाऱ्या प्राध्यापकांना मानधन मिळाले नसल्याची बाब दिनांक १७ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार ऑनलाईन मुल्याकंनाचे काम पूर्ण करणाऱ्या प्राध्यापकांना तातडीने मानधन व इतर लाभ अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०७-०५-२०१८) : (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

ऑनलाईन मुल्यांकनाचे काम केलेल्या बहुतांश प्राध्यापकांना मानधन व अनुषंगीक लाभ अदा करण्यात आलेले आहेत. उर्वरित प्राध्यापकांना मानधन व अनुषंगीक लाभ अदा करण्याबाबतची कार्यवाही विद्यापीठाकडून सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत

(१५) १०५२९६ (०५-०४-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.छगन भुजबळ (येवला) : सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालय, मद्रास येथे प्रलंबित असलेल्या विविध रिट याचिका मा.उच्च न्यायालयाकडून फेटाळण्यात आल्या नंतर मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत राज्यातील अनेक लोकप्रतिनिधी (खासदार) आणि राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे वारंवार पाठपुरावा करण्यात येवूनही आजतागायत मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आलेला नसल्याने पुन्हा याही वर्षी त्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला असून मराठी भाषेचा इतिहास दीड ते दोन हजार वर्षांपुर्वीचा असल्याचे पुरावे सादर केले असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच महाराष्ट्र साहित्य परिषदने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा या करीता केंद्र सरकारकडे मागणी केली असून राज्यातील अनेक सांस्कृतिक संघटनांनी नवी दिल्लीत आंदोलन केल्याची बाब दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, असल्याचे तसेच मराठी भाषेला अभिजात भाषेजा दर्जा मिळण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या प्रा.रंगनाथ पठारे समितीने केंद्र सरकारला पुराव्यासहित सुमारे ५०० पानी अहवाल सादर असून मराठी १५०० ते २०० वर्षाचा इतिहास असतानां जगातील ६७० प्रमुख भाषांपैकी १० व क्रमांकाची भाषा असताना मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्यास शासन अक्षम्य रित्या दुर्लक्ष करीत असल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाकडून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे प्राप्त झाला असून, तो केंद्र शासनाचे विचाराधीन असल्याचे मा.केंद्रीय सांस्कृतिक मंत्री, भारत सरकार यांनी लोकसभागृहात निवेदीत केले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असून अभिजात दर्जा संदर्भात मद्रास उच्च न्यायालयात सुरू असलेले प्रकरण निकाली निघाल्यामुळे पंतप्रधान कार्यालयाने सांस्कृतिक कार्यालयाला सुधारीत कॅबिनेट नोट ठेवावी यासाठी राज्य शासन प्रयत्न करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, एखादया भाषेला राजभाषेचा दर्जा देण्यासाठी केंद्र सरकारने काय निकष निश्चित केले आहेत तसेच केंद्र सरकारच्या राजभाषा विभागाने सन १९७७ व सन २००९ मध्ये जारी केलेल्या परिपत्रकानुसार मराठी भाषेचा वापर केंद्र सरकारची विविध कार्यालये सार्वजनिक क्षेत्रातील बँका, दूरध्वनी, टपालखाते, रेल्वे, मेट्रो, विमानसेवा व मोनोरेल आदि कार्यालयामध्ये मराठी भाषेचा वापर करण्यासंदर्भात शासनाने काय प्रयत्न केले आहेत

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१४-०५-२०१८) : (१) मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबतचा आवश्यक पुराव्यांसह सविस्तर प्रस्ताव दि. १६.११.२०१३ रोजी केंद्र शासनास सादर केला आहे.

(२) राज्यातील महाराष्ट्र साहित्य परिषद तसेच इतर संघटनांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी केंद्र शासनाशी पत्र व्यवहार केला आहे.

तथापि, महाराष्ट्रातील अनेक सांस्कृतिक संघटनांनी नवी दिल्लीत दि. २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास आंदोलन केल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(३) मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे विचाराधीन असल्याचे सांस्कृतिक मंत्रालयाने विभागाला कळविले आहे. तथापि, या मुद्याबाबत केंद्रीय सांस्कृतिक मंत्री यांनी लोकसभेत निवेदन केले नसून दि.०७.०३.२०१८ च्या केंद्रीय अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्यावेळी राज्यातील संसद सदस्यांनी लोकसभेत याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. या मुद्याला उत्तर देताना केंद्रीय गृहमंत्र्यांनी ही बाब केंद्रीय सांस्कृतिक विभागाला कळविण्यात येईल, असे उत्तर दिले. प्रस्तुत प्रकरणी केंद्र शासनाने लवकरात लवकर धोरणात्मक निर्णय घ्यावा याबाबत राज्य शासनाकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) व (५) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४५ अंतर्गत राज्याच्या व्यवहारासाठी राजभाषा अधिनियम करण्याची तरतूद असून त्याअंतर्गत राजभाषा अधिनियम १९६४ अन्वये मराठी भाषा राजभाषा म्हणून स्वीकृत केली आहे.

केंद्रीय राजभाषा अधिनिमांतर्गत केंद्र शासनाने राज्यांकरीता त्रिभाषा सुत्राचा वापर करण्याच्या सूचना केंद्र शासनाने निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार राज्यातील केंद्रीय कार्यालये/उपक्रम यांच्या कार्यालयात हिंदी/इंग्रजी सोबतच मराठी भाषेचा वापर करण्याबाबत दि.१८.०६.१९७७ व दि. ०१.०७.२०१० रोजी केंद्र शासनाने सूचना निर्गमित केलेल्या आहेत. केंद्र शासनाच्या या सूचनांचा काटेकोरपणे अवलंब करण्याबाबत राज्य शासनाने दि.०५.१२.२०१७ च्या परिपत्रकान्वये सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

मराठी भाषा विभागाअंतर्गत डीजीटायझेशन करण्यात आलेले साहित्य लोकाभिमुख करणेबाबत

(१६) १०५७३२ (०५-०४-२०१८). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर) : सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी मराठी भाषा विभागाअंतर्गत विश्वकोश व जुन्या दुर्मिळ पुस्तकांचे डीजीटायझेशन करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील किती पुस्तके वाचली गेली वा डाऊनलोड केली गेली याची ठोस माहिती विभागाकडे किंवा अंतर्गत संस्थाकडे सध्या उपलब्ध नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अतिशय दुर्मिळ व महत्वाचा साहित्य ठेवा ई बुक स्वरुपात उपलब्ध असूनही याला अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्पांना लोकाभिमुख करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२४-०५-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.
(२) संकेतस्थळासंबंधीच्या तांत्रिक अडचणींमुळे संकेतस्थळावरील वाचकांच्या भेटीची नोंद उपलब्ध नाही हे खरे आहे, परंतु ही माहिती वाचकांकरीता मोफत उपलब्ध असल्याने वाचकांनी याचा लाभ घेतला आहे, हे वाचकांनी वेळोवेळी विभागाला कळविले आहे.
(३) नाही. मराठी विश्वकोशाच्या वीस खंडांतील माहिती मोबाईल ॲपमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. ॲपचे लोकार्पण दि.१२ जानेवारी, २०१८ रोजी करण्यात आले आहे. आजपावेतो अठरा हजारांहून अधिक लोकांनी हे ॲप डाऊनलोड केले आहे ४५८ लोकांनी त्यावर आपल्या प्रतिक्रिया नोंदविल्या आहेत. या ॲपचे ४.७ इतके नामांकन वाचकांव्दारे नोंदविण्यात आले आहे.
(४) सदर साहित्य लोकाभिमुख करण्यासाठी विविध माध्यमातून वेळोवेळी प्रसिध्दी देण्यात आली आहे. तसेच शासनाची संकेतस्थळे अद्ययावत करण्याचे काम सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील सर्वजिल्हयांमध्ये संस्था स्तरावर अल्पसंख्यांक समाजाच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन पडताळणीअभावी प्रलंबित राहिल्याबाबत

(१७) १०६०१३ (०५-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व जिल्हयामध्ये संस्थास्तरावर अल्पसंख्याक समाजाच्या विद्यार्थ्यांची नवीन व नुतनीकरणाच्या अर्जाची ऑनलाईन पडताळणी झालेली नसल्यामुळे ३६ हजार ६४६ विद्यार्थी शिष्यष्वृत्तीपासून वंचीत राहिले असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये दिरंगाई केल्याबाबत अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण विभागाचे संचालक यांनी सर्व जिल्हयामधील माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांना दिनांक ५ डिसेंबर वा त्यासुमारास कारणे दाखवा नोटीस बजावून त्याबाबत दिनांक १३ डिसेंबरच्या आत खुलासा मागविलेला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१७-१८ करीता प्री-मॅट्रिक शिष्यवृत्तीचे आॅनलाईन अर्ज पडताळणीची मुदत ३० नोव्हेंबरला संपुष्टात आली असून त्या तारखेविषयी संचालक कार्यालयाने दिनांक १६ नोव्हेंबरला सर्व माध्यमिक शिक्षणधिकाऱ्यांना अवगत करून सुध्दा तो संचालनालयास सादर केला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात का आढळून आले व त्यानुसार अल्पसंख्यांक समाजाच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचीत ठेवणाऱ्या राज्यातील सर्व माध्यमिक शिक्षणांधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०८-०५-२०१८) : (१), (२) व (३) होय.
(४) शाळास्तरावर सक्षम प्राधिका-यांचे उत्पन्न प्रमाणपत्र संबंधित विद्यार्थ्यांनी वेळेत सादर केले नसल्यामुळे शाळास्तरावर अर्ज प्रलंबित राहिले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील आयटीची अंमलबजावणी करणा-या शाळांची पावणे चारशे कोटीची थकित रक्कम तातडीने देण्याबाबत

(१८) १०६६०५ (०६-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षणाचा अधिकार कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यासाठी राज्यशासनाच्या शिक्षण विभागाने शाळांवर बरेच नियम लावलेत मात्र त्यांच्या प्रतिपूर्तीकडे दुर्लक्ष होत होत असुन मागील तीन वर्षात राज्यातील साडेचार हजारावर शाळांची पावणे चारशे कोटींच्यावर थकबाकी असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मेस्ट असोसिएशनने मा.शिक्षण मंत्र्याना थकबाकी मिळण्याबाबत निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०५-०५-२०१८) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) सदर निवेदन शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठात तंत्रज्ञान अधिविभाग स्थापन करण्याबाबत

(१९) १०७०३६ (०५-०४-२०१८). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवाजी विद्यापीठातील (जि.कोल्हापूर) तंत्रज्ञान अधिविभागाच्या अनुदानास मा.मुख्यमंत्री महोदय यांची मान्यता मिळून ६ महिने होऊनही अद्याप सदर ठिकाणी तंत्रज्ञान अधिविभाग स्थापन करण्याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय यांनी पत्राव्दारे याबाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून मागवूनही देण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले वा त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (०८-०५-२०१८) : (१) नाही.
(२) शिवाजी विद्यापीठाने त्यांच्या दिनांक २७/०४/२०१७ च्या पत्रान्वये शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग अनुदानित करण्याचा प्रस्ताव संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर केला होता. परंतु अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने निर्धारीत केलेले निकष व शिवाजी विद्यापीठाने सादर केलेली माहिती यामध्ये विसंगती आढळून आल्यामुळे संचालकांनी त्यांच्या दिनांक ०७/०९/२०१७ च्या पत्रान्वये सुधारीत प्रस्ताव सादर करण्याबाबत शिवाजी विद्यापीठाला कळविले होते. तसेच संचालक, तंत्र शिक्षण यांनी दिनांक १५/०१/२०१८ रोजी शिवाजी विद्यापीठाला स्मरणपत्र देखील पाठविले आहे. परंतु शिवाजी विद्यापीठाकडून अद्यापही सुधारीत प्रस्ताव संचालक, तंत्र शिक्षण यांना पाठविण्यात आलेला नाही.
(३) शिवाजी विद्यापीठाने सुधारीत प्रस्ताव संचालक, तंत्र शिक्षण यांच्याकडे सादर केल्यानंतर संचालक, तंत्र शिक्षण हे सदर प्रस्ताव तपासून शासनास सादर करतील व तद्नंतर या प्रकरणी निर्णय घेणे आवश्यक राहिल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पालम गंगाखेड (जि.परभणी) तालुक्यातील खाजगी विना अनुदानीत विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके देण्याबाबत

(२०) १०७६७१ (०६-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालम गंगाखेड (जि.परभणी) तालुक्यातील खाजगी विना अनुदान शाळेत गत २ वर्षापासून विद्यार्थी संख्येचा मासिक अहवाल असलेल्या पहिली ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचे शिक्षण वाया जाऊ नये यासाठी मोफत पुस्तके द्यावीत अशी मागणी लोकप्रतिनिधींनी व स्थानिक सामाजिक संस्थांनी शिक्षणाधिकारी व शिक्षण विभागाकडे केली असल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसर विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके देण्याबाबत कोणती कार्यवाही कली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (३०-०५-२०१८) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात मराठी भाषा धोरण ठरविण्याबाबत

(२१) १०७७०६ (०५-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारतातील अनेक राज्यात त्यांच्या राज्याची राजभाषा उच्च माध्यमिक शिक्षणापर्यंत सक्तीची करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्रात अजूनही असे धोरण आले नसल्यामुळे मराठी भाषा सक्तीची करता येत नाही, असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील मराठी भाषा सल्लागार समितीने मराठी भाषा धोरणाचा मसुदा तयार करून दिनांक ३० जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार मराठी भाषा धोरण ठरविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१४-०५-२०१८) : (१) नाही
(२) अंशतः खरे आहे.
(३) होय.
(४) धोरणात्मक निर्णय घेण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सूरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

कर्जत (जि.रायगड) येथील इंजिनिअरींग महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित वेतनाबाबत

(२२) १०८६३८ (०५-०४-२०१८). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील यादवराव तासगाव इन्स्टिट्यु ऑफ इंजिनिअरिंग टेक्नॉलॉली आणि इंजिनिअरींग मॅनेजमेंट या दोन महाविदयालयातील शिक्षण व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना गत १५ महिन्यापासून वेतन मिळालेले नाही त्याचा प्रॉव्हीडंट फंड भरलेला नसणे, त्यांना गेल्या ५ वर्षापासून आयकर रिटर्न भरण्यासाठी फॉर्म-१६ न देणे व इतर मागण्याच्या संदर्भात शासनाने प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सर संचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई यांच्यास्तरावरुन चौकशी समिती गठीत केली असून सदरील समितीने शासनास अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त तालुक्यातील सरस्वती शिक्षण संस्थेच्या तासगावकर अभियांत्रिकी व औषध निर्माण महाविद्यालयातील शिक्षक, प्राध्यापकांना गत १५ महिन्यांपासून वेतन न मिळाल्याच्या अनेक तक्रारी संचालक तंत्रशिक्षण संचालनालय यांचेकडे आल्याचे डॉ.अभय वाघ यांनी मान्य केले असून, सदर प्रकरणाच्या चौकशीचे आदेश सहसंचालकांना दिल्याची बाब दिनांक १४ जानेवारी २०१८ रोजी वा त्या सुमारास, निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संचालक तंत्रशिक्षण संचालनालय यांनी सहसंचालकांना दिलेल्या आदेशानुसार व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने महाविद्यालय प्रशासनाच्या चौकशीचे आदेश दिल्यानुसार या चौकशा पूर्ण झाल्या आहेत काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यामध्ये दोषी आढळलेल्या संस्थेच्या पदाधिकारी, व्यवस्थापन व मालकाविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये याकरिता कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०५-०५-२०१८) : (१) होय.

(२) होय.

(३) प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण, मुंबई यांच्या स्तरावर गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीकडून चौकशीची कार्यवाही पूर्ण झाली असून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली या शिखर संस्थेच्या स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) यादवराव तासगावकर एज्युकेशन सोसायटी, कर्जत, जि.रायगड या संस्थांतर्गत असलेल्या महाविद्यालयांकडून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली या शिखर संस्थेव्दारे शैक्षणिक वर्ष सन २०१८-१९ करिता प्रसिध्द करण्यात आलेल्या Approval Process Handbook नुसार विहीत करण्यात आलेल्या वेतनविषयक निकषाचे उल्लंघन झाल्याबाबतचा अहवाल चौकशी समितीकडून प्राप्त झाला आहे. कोणत्याही व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांविरूध्द कारवाई करण्याचा अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली या शिखर संस्थेस आहे. त्यानुषंगाने सदर संस्थेविरूध्द कारवाई करण्याबाबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना कळविण्यात आले असून परिषदेकडून संस्थेस कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

वडगावशेरी (जि.पुणे) येथील येरवडा येथे विभागीय क्रीडा संकुलानाचे काम अपूर्ण असल्याबाबत

(२३) १०९०३० (०६-०४-२०१८). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडगावशेरी (जि.पुणे) या भागातील येरवडा येथील विभागीय क्रीडा संकुलात नवीन खेळाडू निर्माण व्हावेत या हेतूने शासनाने उक्त क्रीडा संकुलात मोठ्या बंदिस्त खेळाचे मैदान निर्माण करण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला असून त्या निधीचा योग्य वापर झाला नसल्याचे निदर्शनास येत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०४-०५-२०१८) : (१) हे खरे नाही.

(२) पुणे विभागीय क्रीडा संकुलामध्ये जलतरण तलाव, इनडोर हॉल, लॉनटेनिस कोर्ट - ३, बास्केट बॉल कोर्ट - १, बॅडमिंटन हॉल - ४ कोर्ट व कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल मैदान, सरंक्षण भिंत, ड्रेनेज व्यवस्था, विद्युतीकरण, अंतर्गत रस्ते, क्रीडा साहित्य या सुविधा निर्माण करण्यात आलेल्या आहेत. सदर सुविधांचा विद्यार्थी, खेळाडु, सर्वसामान्य जनता यांच्याकडुन दैनंदिन वापर व सराव सुरु आहे. तथापि, विभागीय क्रीडा संकुलाच्या जागेचे BOT तत्वावर स्पोर्टानिया गोल्फ ॲन्ड क्रीकेट कंपनी प्रा.ली. नागपुर यांचेशी झालेल्या करारनाम्यानुसार झालेले बांधकाम अपुर्ण अवस्थेत आहे. सदर कंपनीने दिलेल्या मुदतीत काम पुर्ण न केल्यामुळे गोल्फ आणि क्रीकेटचे काम थांबवले आहे. या बांधकामा करिता शासनाचा कोणताही निधी खर्च करण्यात आलेला नाही. संबंधित कंपनीला करारनामा भंग केल्याची नोटीस देवुन मालमत्ता विभागीय क्रीडा संकुल समितीने ताब्यात घ्यावी असा ठराव दिनांक २५ जानेवारी, २०१८ च्या सभेत मंजुर केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

आर.टी.ई कायद्यानुसार राज्यातील शाळांमध्ये इयत्ता ६ वी ते ८ वी वरील प्रशिक्षित पदवीधरांना वेतनश्रेणी मिळत नसल्याबाबत

(२४) १०९१४१ (०६-०४-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर.टी.ई कायद्यानुसार राज्यातील शाळांमध्ये इयत्ता ६ वी ते ८ वी वरील प्रशिक्षित पदवीधर यांना वेतनश्रेणी मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास, त्यानुसार प्रशिक्षित पदवीधारकांना वेतनश्रेणी देण्या बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (११-०५-२०१८) : (१) अंशत: खरे आहे.

(२) शासनाच्या दिनांक १३.१०.२०१६ च्या शासन निर्णयान्वये आर.टी.ई. कायद्यानुसार विज्ञान, भाषा व सामाजिक शास्त्र असे ३ विषय संवर्ग निश्चित केले आहेत. तथापि इयत्ता ६ वी ते ८ वी या वर्गांना शिकविणाऱ्या शिक्षकांपैकी १/३ शिक्षकांना सेवाज्येष्ठतेनुसार पदवीधर वेतनश्रेणी देय आहे. सरसकट पदवीधर वेतनश्रेणी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात बीएलओ चे काम नाकारल्यामुळे शिक्षकांवर गुन्हे दाखल करण्यात आल्याबाबत

(२५) १०९२२३ (०६-०४-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बीएलओ चे काम नाकारल्यामुळे शिक्षकांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मा.शालेय शिक्षण मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यालस, या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२५-०५-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) निवेदनाच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाकडे संदर्भ करण्यात आला होता. मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार बीएलओ आदेश न स्विकारणाऱ्या आणि बीएलओ चे काम करण्यास नकार देणाऱ्या शिक्षकांविरुध्द मतदार नोंदणी अधिकारी यांनी केलेली कार्यवाही संयुक्तिक असल्याचे अभिप्राय त्या विभागाने दिले आहेत.

महाराष्ट्र, कर्नाटक सीमा भागात मराठी भाषा व संस्कृतीचा विकास व समृद्धीकरिता अर्थ सहाय्य देण्याच्या प्रस्तावाबाबत

(२६) १०९४४७ (०६-०४-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र, कर्नाटक सीमा भागात मराठी भाषा व संस्कृतीचा विकास व समृद्धी करण्याच्या हेतूने अर्थ सहाय्य देण्याची योजना राबविण्यासाठीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदर प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,तसेच किती अर्थ सहाय्य देण्यात येणार आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०४-०५-२०१८) : (१) होय.
(२) धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

प्राथमिक व माध्येमिक शिक्षकांचे डीसीपीएस अंतर्गत कपात केलेल्या देयकांची पोच पावती शिक्षकांना देण्याबाबत

(२७) १०९५५९ (०६-०४-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात २००५ नंतर सेवेत लागलेल्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचे डीसीपीएस अंतर्गत कपात केलेल्या देयकांची पोच पावती शिक्षकांना देण्यात आली नसल्यांचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेंतर्गत अद्यापपर्यंत किती निधी जमा करण्यात आला व या जमा केलेल्या् निधीचे पोच शिक्षकांना केंव्हापर्यंत देण्यात येणार आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यानुसार शिक्षकांना उत पोचपावती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (३०-०४-२०१८) : (१) होय हे खरे आहे.
(२) शासनाच्या दि.२८/२/२०१८ च्या निर्णयान्वये शासन हिस्सा व व्याजाची रक्कम वितरित करण्यात आलेली आहे. सदर निधी जिल्हानिहाय वितरित केल्यानंतर जमा केलेल्या निधीची शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पोच देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या शुल्काचे धनादेश वटवले नसल्याची

(२८) ११०३६३ (०६-०४-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील टंचाईजन्य परिस्थितीमुळे गतवर्षी शासनाने दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना शुल्काची रक्कम परत केली मात्र जवळपास ५० टक्के विद्यार्थ्यांनी या रक्कमेचे धनादेश वटवले नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळूनआले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काये आहेत ?

श्री. विनोद तावडे (०८-०५-२०१८) : (१) व (२) होय.

टंचाईजन्य भागातील इ.१० व इ.१२ वीच्या पात्र विद्यार्थ्यांच्या नावाच्या याद्या व फी प्रतीपूर्तीचे रेखांकित धनादेश संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना पाठविण्यात आले आहेत. माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी सदरचे धनादेश संबंधित विद्यार्थ्यांना वितरीत करण्याची कार्यवाही केली आहे. तथापि, खालील कारणांमुळे धनादेश वितरीत न झाल्याचे/न वटल्याचे संबंधित शाळा/कॉलेज मुख्याध्यापक/प्राचार्यांनी कळविले आहे :-

१. बरेच विद्यार्थी पुढील शिक्षणाकरीता बाहेरगावी निघून गेलेले आहेत.
२. विद्यार्थी शाळा सोडून गेलेले आहेत.
३. ब-याच विद्यार्थ्यांनी बँकेत खाते उघडलेले नाही.
४. बरेच विद्यार्थी धनादेश मुदतीत बँकेत भरणा करत नाहीत.
५. काही विद्यार्थ्यांशी शाळेचा संपर्क होवू शकला नाही.

वितरीत न झालेले, मुदतबाह्य झालेले धनादेश उपरोक्त कारणे दाखवून मुख्याध्यापकांनी/प्राचार्यांनी परत पाठविले आहेत. अशा विद्यार्थ्यांशी संपर्क साधून संबंधित विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात परीक्षा फी प्रतीपूर्तीची रक्कम अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे येथील अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये नेमणूकामधील अनियमितता व गैरव्यवहार करणाऱ्यांवर कारवाई होत नसल्याबाबत

(२९) ११०४२३ (१५-०४-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये नेमणूकामधील अनियमितता व गैरव्यवहार करणाऱ्यांवर कारवाई होत नसल्याबाबत आमरण उपोषण करण्याचा इशारा अभियांत्रिकी महाविद्यालय राजपत्रित अध्यापक/अधिकारी संघाने शासनाला दिला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात प्रत्येक अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये असे प्रकार होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अभियांत्रिकी महाविद्यालयातील अनियमितता व गैरव्यवहार टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०८-०५-२०१८) : (१) होय.

(२) नाही.

राज्यातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांतील शिक्षकीय पदांच्या नियुक्त्या शासनाकडून मागणीपत्र पाठवून व त्यानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्राप्त होणा-या शिफारशीनुसार करण्यात येतात.

(३) या प्रकरणी सहसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय यांच्या स्तरावर चौकशी समिती गठीत करून चौकशीची कार्यवाही पूर्ण झाली आहे. त्यानुषंगाने नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत असून सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मिणचे (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथे क्रिडा संकुलाकरिता सात एक जागा मिळण्याबाबत

(३०) १११५०० (०६-०४-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिणचे (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथे क्रिडा संकुलाकरिता सात एकर जागा निवडण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील जागा क्रिडा विभागाने ताब्यात घेतली आहे काय,

(३) असल्यास, क्रिडा संकुलाच्या कामाला केव्हापासून सुरुवात होणार आहे व किती कालावधीत हे काम पूर्ण करण्याचा मानस आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात केाय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०४-०५-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) हातकणंगले तालुका क्रीडा संकुलासाठी मिणचे येथील गायरान गट क्र.४९९ मधील सलग ७ एकर जागा ही ग्रामपंचायत मिणचे यांनी जनरल ग्रामसभा विषय क्र.१० दि.२६.०१.२०१७ ठराव क्र.१२२ चा जरुरी पुरता उतारा अन्वये जिल्हाधिकारी, कोल्हापुर यांचे पूर्व परवानगीने देणेस मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने तहसिलदार हातकणंगले यांचे कडे जागा हस्तांतरण करणे बाबतचा प्रस्ताव दि.३०.०५.२०१७ रोजी सादर करण्यात आलेला आहे. सदर जागा प्राप्त करुन घेण्याबाबत तालुका क्रीडा अधिकारी, हातकणंगले यांच्यामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे. सदर जागा संकुल समितीला प्राप्त झाल्यानंतर अंदाजपत्रक व आराखडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तयार करुन त्यास आगामी राज्य क्रीडा विकास समितीच्या बैठकीमध्ये प्रशासकीय मान्यता देवून निधी वितरण केल्यानंतर बांधकामास सुरुवात करण्याचे प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

रावेर(जि.जळगाव) मतदार संघात यावल व रावेर पंचायत समितीमध्ये कायम स्वरूपी गटशिक्षणअधिकाऱ्यांची नियुक्ती करणेबाबत

(३१) १११५८५ (०६-०४-२०१८). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रावेर (जि.जळगाव) मतदार संघामधील यावल व रावेर पंचायत समिती मध्ये अद्यापही प्रभारी गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे संपूर्ण कार्यभार असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यावल व रावेर हे मोठे तालुके असल्यामुळे प्रभारी गटशिक्षणाधिकारी यांना शिक्षणाच्या गुणवत्तेकडे लक्ष देण्यास अनेक अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार यावल व रावेर तालुक्यांमध्ये गटशिक्षणाधिकारी यांची कायमस्वरूपी नेमणूक करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०७-०५-२०१८) : (१) होय खरे आहे
(२) हे खरे नाही

(३) गटशिक्षणाधिकारी हे उपशिक्षणाधिकारी व तत्सम संवर्गातील पद आहे. उपशिक्षणाधिकारी पदाच्या दिनांक ५.०७.२०१६ च्या सेवाप्रवेश नियमानुसार ३ मार्गाने पदभरती करण्यात येते. उपशिक्षणाधिकारी व तत्सम संवर्गातील मंजूर ६१५ पदांपैकी ३३२ पदे भरलेली असून २८३ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदे भरण्याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही सुरू आहे. विभागीय मर्यादित परीक्षेद्वारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत १२३ पदे भरण्याबाबत दि.१३.०८.२०१७ रोजी परीक्षा घेण्यात आली आहे. उमेदवार निवडीची प्रक्रीया आयोगाकडून सुरू आहे. गट-क संवर्गामधून पदोन्नती कोट्यातील रिक्त असलेली पदे भरण्यासाठी सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती क्षेत्रात येणाऱ्या कर्मचाऱ्यांची आवश्यक माहिती आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून मागविण्यात आली असून, रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सरळसेवा कोट्यातील रिक्त पदे राज्यसेवा परीक्षमार्फत भरण्यात येतात. राज्येसवा मुख्य परीक्षा २०१६ च्या निकालाद्वारे निवड झालेल्या व हजर झालेल्या ६ उमेदवारांचे परिविक्षाधीन प्रशिक्षण सुरू आहे. तसेच राज्यसेवा मुख्य परिक्षा २०१७ करिता ५९ उमेदवारांचे मागणीपत्र आयोगाकडून सादर केले असून आयोगाने अद्याप उमेदवारांची शिफारस शासनाकडे केलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

उच्च शिक्षण संचालनालयाच्या कार्यकक्षेत येणा-या महाविद्यालयांना रोजगारक्षम नसलेल्या अथवा कालबाहय अभ्यासक्रम बंद करण्याच्या निर्णयाबाबत

(३२) १११६७९ (०५-०४-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च शिक्षण संचालनालयाच्या कार्यकक्षेत येणा-या महाविद्यालयांना रोजगारक्षम नसलेल्या अथवा कालबाहय अभ्यासक्रमांचा आढावा घेण्याचे निदेश माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निदेशानुसार आढावा घेण्यात आला आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणकोणते अभ्यासक्रम बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (११-०५-२०१८) : (१) होय

(२) व (३) या संदर्भात सर्व अकृषी विद्यापीठाकडून अहवाल मागविण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील कला, वाणिज्य व विज्ञान महाविलयात नवीन पदनिर्मिती व पद भरतीबाबत

(३३) ११२१४१ (०५-०४-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.प्रदीप नाईक (किनवट) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विविध महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील नोकरभरती करण्यास शासनाने स्थगिती दिली असून दिनांक १६ सप्टेंबर, २०१६ च्या शासन निर्णयानुसार सुधारीत आकृतीबंध मंजूर होईपर्यंत नवीन पदनिर्मिती व पद भरती करण्यात येत ना,ही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील उक्त महाविलयांमध्ये मोठया प्रमाणात प्राध्यापकांची पदे रिक्त असून त्याचा शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत असल्याने सद्यस्थितीत पदव्युत्तर पदवी, एम.फील, नेट, सेट आदि पात्रता धारण करणाऱ्या प्राध्यापकांची प्रतिमहा ६,७२० रु. इतक्या मानधनावर वर्षातील ७ महिन्यांसाठी नियुक्ती दिली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील शाखानिहाय एकूण किती पदे रिक्त आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सुधारीत आकृतीबंधाला तात्काळ मंजूरी देवून उक्त महाविद्यालयात पदनिर्मिती व पद भरती याला ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०७-०५-२०१८) : (१) वित्त विभागाच्या दिनांक १६/९/२०१६ च्या शासन निर्णयान्वये सुधारीत आकृतीबंध मंजूर होईपर्यंत नवीन पदनिर्मितीचे प्रस्ताव सादर करु नयेत असे निदेश देण्यात आलेले आहेत. तसेच दिनांक २५/५/२०१७ च्या शासन निर्णयानुसार सुधारीत आकृतीबंध मंजूर होईपर्यंत पद भरतीस बंदी आहे.

(२) अंशतः खरे आहे. अधिव्याख्यात्यांच्या रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शैक्षणिक काम पुर्ण करण्यासाठी तासिका तत्वावरील अभ्यागत अधिव्याख्याता नियुक्तीची तरतुद आहे. त्यानुसार तासिका तत्वावर अधिव्याख्याता नियुक्ती करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याची काळजी घेण्यात येते.

(३), (४) व (५) वित्त विभागाच्या प्रचलित धोरणानुसार पदांच्या आढाव्यास /आकृतीबंधास अंतिम मंजूरी मिळण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे. महत्वाची रिक्त पदे भरण्यासंदर्भात वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

हिंगोली जिल्ह्यातील क्रीडा संकुलाच्या दुरुस्तीबाबत

(३४) ११२५४५ (०६-०४-२०१८). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील क्रीडा संकुलाच्या दुरुस्तीवर मोठ्या प्रमाणावर निधी खर्च होऊनही त्याठिकाणी कोणत्याही प्रकारच्या सोयी-सुविधा नसल्याने जिल्ह्यातील क्रीडापट्टुनी नाराजी व्यक्त केली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्रिडा संकुलाच्या उभारणीसाठी प्राप्त झालेला निधी खर्च न झाल्याने व परत गेल्यामुळे जिल्हा निर्मितीनंतर एकही क्रिडा संकुल अस्तित्वात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (०४-०५-२०१८) : (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हिंगोली जिल्हा क्रीडा संकुलास सन २०००-०१ मध्ये रु.३२९.१८ लक्ष निधी वितरीत करण्यात आला असून सदर निधीमधून ४०० मी. धावण मार्ग, जलतरण तलाव फिल्ट्रेशन प्लॅन्टसह, ८० बेडचे वस्तीगृह, खुले प्रेक्षागृह, संरक्षण भिंत, प्रवेशद्वार इत्यादी सुविध निर्माण करण्यात आलेल्या आहेत. याशिवाय रु.४११.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे. सदर निधीमधून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बहुउद्देशिय हॉलचे बांधकाम हाती घेण्यात आले असून बांधकाम प्रगतीपथावर आहे.

जलतरण तलावाच्या दुरुस्ती संदर्भात जलतरण तलाव निर्माण करणाऱ्या एजन्सीमार्फत अंदाजपत्रक तयार करुन अधिक्षक अभियंता, सार्वनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांचेकडे तांत्रिक मान्यतेसाठी सादर केले आहे. सदर अंदाजपत्रकास सार्वजनिक बांधकाम विभागाची तांत्रिक मान्यता प्राप्त होताच जिल्हा क्रीडा संकुल समितीकडे जमा असलेल्या रक्कमेतून जलतरण तलावाचे काम पूर्ण करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राष्ट्रीय अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळा मार्फत परदेशी शिक्षण कर्ज योजना सुरु केल्याबाबत

(३५) ११२९६९ (०५-०४-२०१८). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राष्ट्रीय अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळा मार्फत परदेशी शिक्षण कर्ज योजना सुरु करण्यात आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेमधून सन २०१४-२०१७ या वर्षात एकूण किती अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना त्यांचा लाभ देण्यात आलाआहे,
(३) तसेच, या योजनेचे गत ३ वर्षातील उद्दीष्ट साध्य झाले आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२५-०५-२०१८) : (१) होय.
(२), (३) व (४) राष्ट्रीय अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ (NMDFC) कडून मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांच्यामार्फत मुदत कर्ज योजना, सुक्ष्म पतपुरवठा योजना व राजीव गांधी शैक्षणिक कर्ज योजना राबविण्यात येतात. NMDFC कडून महामंडळाला मुदत कर्ज योजना व सुक्ष्म पतपुरवठा योजनेंतर्गत निधी उपलब्ध केला जातो. मुदत कर्ज योजनेंतर्गत उपलब्ध झालेल्या निधीच्या २०% रक्कम शैक्षणिक कर्ज योजना (राजीव गांधी शैक्षणिक कर्ज योजना) उपलब्ध असते. शैक्षणिक कर्ज योजनेंतर्गत भारतातील व भारताबाहेरील अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक कर्ज दिले जाते. तथापि, NMDFC च्या Credit line १ व २ नुसार भारताबाहेरील अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक कर्ज मर्यादा पाच वर्षासाठी अनुक्रमे रू.२० लक्ष व रू.३० लक्ष आहे. त्यामुळे सदर योजना राबविण्याकरिता जास्त निधीची आवश्यकता आहे. सदर रक्कमNMDFC ने वितरित केलेल्या शैक्षणिक कर्जाच्या तुलनेत खूप जास्त आहे. तीनही योजनांच्या लाभार्थ्यांकडून होत असलेल्या नगण्य कर्ज वसूलीमुळे NMDFC ची परतफेड महामंडळाच्या भागभांडवलातून करण्यात येत आहे. सदर बाबींमुळे NMDFC मार्फत राबविण्यात येणारी भारताबाहेरील अभ्यासक्रमाकरिता शैक्षणिक कर्ज योजना मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांच्यामार्फत राबविण्यात येत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

शासकीय तंत्रनिकेतन व औधोगिक प्रशिक्षण संस्थामध्ये अल्पसंख्यासाठी दुसरीपाळी सुरु करण्याबाबत

(३६) ११२९७२ (०५-०४-२०१८). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय तंत्रनिकेतन व औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये अल्पसंख्याकासाठी सन २०१४ पासून दुसरीपाळी सुरु करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच भिवंडी व मालेगाव येथे अल्पसंख्याकासाठी नवीन तंत्रनिकेतन व औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्यासाठी मान्यता देण्यात आली असूनही तेथे संस्था सुरु करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळूल आले व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२९-०५-२०१८) : (१) नाही.

दि.८ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयान्वये सन २०१४-१५ पासून पुणे, लातूर व हिंगोली ३ विद्यमान शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी दुसरी पाळी सुरु करण्यात आली आहे.
(२) व (३) या विभागाच्या दि.५ फेब्रुवारी, २०१० च्या शासन निर्णयान्वये भिवंडी येथे अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी नवीन खाजगी तंत्रनिकेतन संस्था सुरू करण्यासाठी अशासकीय संस्थांना आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तथापि, सरकारी/ खाजगी तंत्रनिकेतनात असलेल्या रिक्त जागा, खाजगी संस्थांमार्फत आकारण्यात येणारी फी, All India Council for Technical Education (AICTE) यांनी नवीन तंत्रनिकेतन स्थापन करण्याबाबत लागू केलेले सुधारित निकष इत्यादीचा सर्वंकष विचार करून शासकीय तंत्रनिकेतन स्थापन करण्याच्या दृष्टीने सुयोग्य जागेचा शोध घेण्यात येत आहे.
मालेगांव येथे अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात पी.एच.डी. प्राप्त केलेल्या उमेदवारांना सहाय्यक प्राध्यापक पदावर तासिका तत्वावर करावे लागत असल्याबाबत

(३७) ११३१३९ (०५-०४-२०१८). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामध्ये प्राध्यापक पदांच्या जागा रिक्त असतानाही शासनाने जाहिरात न काढल्यामुळे पी.एच.डी. धारकांना प्रतिमहा ६ हजार ७२० रुपयामध्ये काम करावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या खाजगी करणाच्या धोरणामुळे निवृत्त झालेल्या प्राध्यापकाच्या जागेवर नव्याने भरती न करता रिकाम्या जागेवर पीएचडी, नेट, सेट झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांची तासिक तत्वावर नियुक्ती करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने भरतीवर घातलेली बंदी न उठविण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, भरतीवरील बंदी उठविण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०७-०५-२०१८) : (१) अंशतः खरे आहे
(२) अंशतः खरे आहे.
(३) व (४) (५) वित्त विभागाच्या प्रचलित धोरणानुसार पदांच्या आढाव्यास/आकृतीबंधास अंतिम मंजूरी मिळण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे. महत्वाची रिक्त पदे भरण्यासंदर्भात वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयतील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी व सेवाशर्तीच्या सेवाशर्ती लागू करण्याबाबत

(३८) ११३३५० (०५-०४-२०१८). श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयाच्या कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी व सेवाशर्ती लागू करण्यासाठी शासनाने नेमलेल्या प्रभाराव समिती व व्यंकप्पा पत्की समितीने केलेल्या शिफारशीची अंमलबजावणी तसेच सदरहू कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्याप्रकरणी निर्णय घेण्यास दिरंगाई होत असल्याने ग्रथालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असून ग्रंथालय चळवळीसही बांधा येत आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्यातील ग्रंथालय कर्मचाऱ्यांना वेतन श्रेणी व सेवा शर्ती लागू करण्याकरीता सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी संघटना माहे २००० सालापासून आजतागायत मागणी करत असून याबाबत वेतनश्रेणी लागू न केल्यास ग्रंथालय कर्मचारी यांनी ग्रंथ मित्र पुरस्कार शासनास परत करणेबाबत मा.उच्च तंत्र शिक्षण मंत्री यांचेकडे दिनांक ३१ जानेवारी, २०१८ रोजी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच राज्यातील ग्रंथालय कर्मचा-यांना वेतनश्रेणी व सेवा नियम शासकीय कर्मचा-यांप्रमाणे लागू करावेत व इतर मागण्यांसाठी महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय, कर्मचारी कृती समिती, कोल्हापूर यांनी मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांना दिनांक ९ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या अ)ग्रंथालयाच्या अनुदानामध्ये दुप्पट वाढ करावी व वार्षिक २० टक्के अनुदानामध्ये वाढ करावी ब) कर्मचारी वेतनश्रेणी व सेवाशर्ती सेवानियम लागू करावे क) राज्यातील शतायु ग्रंथालयाला दरवर्षी रूपये १ लाख अनुदान द्यावे ड) ग्रंथालयाचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने शासनमान्य जिल्हा ग्रंथालय संग्राचा एक प्रतिनिधी जिल्हानियोजन समितीवर सदस्य म्हणून घ्यावा इ) नवीन ग्रंथालयाला मान्यता, ग्रंथालयाचे दर्जा बदल,फर्निचर अनुदान पूर्ववत सुरू करण्यात यावे उ) ज्या गावात शासनाच्या मालकीच्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद इमारतीतील खोल्या जागा रिकाम्या आहेत अशा जागा त्या गावातील ग्रंथालयाला उपलब्ध करून द्याव्यात क) राज्य शासनाच्या ग्रंथालय संचालनालय खात्यामध्ये नोकर भरती करताना सार्वजनिक ग्रंथालयातील सेवकांना सरळ सेवा भरतीने सेवेत समावून घेण्यात यावे तसेच ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करण्याबाबत सार्वजनिक ग्रंथालय अधिनियमात सुधारणा करण्याची मागणी दिनांक २८ नोव्हेंबर, २०१० रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सार्वजनिक ग्रंथालयात काम करणाऱ्या सेवकांना वेतनश्रेणी व सेवाशर्ती लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०५-०५-२०१८) : (१) श्रीमती प्रभा राव समिती व मा.व्यंकाप्पा पतकी समितीने राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी देण्याबाबत शिफारस केली होती. तथापि, त्यासाठी पडणारा मोठया प्रमाणावरील आर्थिक भार सोसणे शासनास शक्य होणार नसल्यामुळे त्याप्रमाणे वेतनश्रेणी बाबत कार्यवाही शासनाने केली नाही. परंतु कर्मचाऱ्यांच्या वेतनात शक्य ती वाढ करण्याच्या दृष्टीकोनातून १९७० मध्ये अनुदानविषयक नियम झाल्यानंतर प्रथमच १९७९-८० मध्ये त्यानंतर १९८९-९०, १९९५-९६, १९९८-९९, २००४-०५ मध्ये परीरक्षण अनुदान त्या-त्या वेळच्या अनुदानाच्या दुप्पटीने वाढविण्यात आले आहे. त्यानंतर सन २०१२-१३ पासून अनुदानात ५०% वाढ करण्यात आली आहे.

(२) (३) व (४) ग्रंथालय कर्मचा-यांच्या विविध मागण्यांबाबत शासनाकडे निवेदने प्राप्त झाली आहेत. सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी, सोलापूर अधिवेशन कृती समिती यांचे सार्वजनिक ग्रंथालयांच्या विविध मागण्यांबाबत दिनांक ३१.०१.२०१८ रोजीचे निवेदन प्राप्त आहे.

(५) मा.व्यंकाप्पा पतकी, माजी विधानपरिषद सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली सन २००१ मध्ये समिती नेमली होती. त्या समितीने आपला अहवाल सन २००२ मध्ये शासनास सादर केला. त्या अहवालामध्ये राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांसाठी वेतनश्रेणी व सेवाशर्ती लागू करण्याबाबत शिफारस केली होती. परंतु या संदर्भात ग्रंथालय चळवळीमधील पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यासोबत दि.२९.१०.२००३ रोजी तत्कालीन मा.मंत्री (उच्च शिक्षण) यांच्या दालनात झालेल्या बैठकीमध्ये या समितीच्या शिफारसींमुळे येणाऱ्या मोठया प्रमाणावरील आर्थिक भारामुळे त्या स्विकारणे शक्य नाही असे स्पष्ट केलेले आहे. परंतु,

कर्मचाऱ्यांच्या वेतनात शक्य ती वाढ करण्याच्या दृष्टीकोनातून व त्यांना किमान दिलासा मिळावा म्हणून १९७० मध्ये अनुदानविषयक नियम झाल्यानंतर प्रथमच १९७९-८० मध्ये त्यानंतर १९८९-९०, १९९५-९६, १९९८-९९, २००४-०५ मध्ये ग्रंथालयांचे अनुदान वाढवून त्या-त्या वेळच्या अनुदानाच्या दुप्पट केले व त्यानंतर सन २०१२-१३ पासून त्या अनुदानामध्ये ५०% अनुदान वाढ करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

तालुका क्रीडा संकुल नांदगांव (ता.नांदगांव, जि.नाशिक) या क्रीडा संकुलाअंतर्गतची कामे अपूर्ण असल्याबाबत.

(३९) ११३३५४ (०६-०४-२०१८). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तालुका क्रीडा संकुल नांदगांव (ता.नांदगांव, जि.नाशिक) या क्रीडा संकुलाअंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नाशिक, या कार्यालयामार्फत सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक पुर्व या विभागाकडे ३ वर्षापासून निधी वर्ग करूनही क्रीडा संकुलाअंतर्गतची कामे अपुर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, व त्यानुसार तालुका क्रीडा संकुलाअंतर्गत अपूर्ण असलेली कामे पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०४-०५-२०१८) : (१) अंशत: खरे आहे.

(२) सार्वजनिक बांधकाम विभागाने दिनांक ०६.१२.२०१७ रोजी नांदगांव तालुका क्रीडा संकुल समितीस पत्र पाठवुन त्यांचेकडे सोपविण्यात आलेल्या कामांपैकी बरीचशी कामे पुर्ण झालेली असल्याचे कळविले आहे. परंतु अद्यापर्यंत कोणत्याही कामाबाबत पुर्णत्व प्रमाणपत्र सादर करुन सदर सुविधा क्रीडा संकुल समितीकडे हस्तांतरीत केलेल्या नाहीत. उपरोक्त कामे पुर्ण करुन देण्यासाठी वेळोवेळी संकुल समितीने सार्वजनिक बांधकाम, विभागास पत्राद्वारे व दुरध्वनीद्वारे संपर्क करुन विनंती करण्यात आलेली आहे. तसेच दिनांक ०७.०२.२०१७, १२.११.२०१७ व ०७.०२.२०१८ रोजी बैठकीचे आयोजन करुन सुविधा पुर्ण करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास सुचना देण्यात आल्या आहेत. सदर बैठकीमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाने येत्या तीन महिन्यात सदर काम पूर्ण करण्यात येईल असे आश्वासीत केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

बारामती, शिरूर (जि.पुणे) तालुक्यात अनेक मंगल कार्यालयामध्ये ६ ते ८ वयोगटातील अनेक मुले काम करत असल्याबाबत

(४०) ११३४२७ (०६-०४-२०१८). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने एप्रिल २०१० मध्ये मंजूर केलेल्या शिक्षण हक्क कायदयानुसार मुलांसाठी सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याचे धोरण ठरविण्यात आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्हतील बारामती, शिरूर तालुक्यात असणाऱ्या अनेक मंगल कार्यालयामध्ये ६ ते ८ वयोगटातील अनेक मुले काम करत असल्याचे माहे २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०५-०५-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

कोरपना (जि.चंद्रपुर) तालुक्यातील क्रीडा संकुलाचे प्रलंबित असलेल्या बांधकामाबत

(४१) ११३६०१ (०६-०४-२०१८). ॲड.संजय धोटे (राजूरा), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरपना (जि.चंद्रपुर) तालुक्यातील क्रीडा संकुलास मंजुरी मिळूनही गत पाच वर्षापासुन उक्त संकुलाचे बांधकाम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उपरोक्त बांधकाम पुर्ण करण्याकरिता तसेच क्रीडा संकुल विकसित करण्यासाठी निधी व नव्याने आराखडा मंजुर करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०४-०५-२०१८) : (१) अंशत: खरे आहे.

(२) कोरपना तालुका क्रीडा संकुलाचे कामाबाबत जिल्हा क्रीडा अधिकारी, चंद्रपुर यांनी चौकशी केली असता २०० मी. धावनपथ व विविध खेळाची मैदाने यांची कामे बंद होती. सद्यस्थितीत ती पुर्ववत सुरु करण्यात आली असून २०० मी. धावनपथाचे काम सुरु आहे. तसेच संकुलातील बॉस्केटबॉल पोल व फुटबॉलचे पोल बसवुन खेळाडुंना सरावा करिता उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. बहुउदेशिय हॉल, विद्युतीकरण, क्रीडा साहित्य खरेदी, प्रसाधनगृह बांधकाम व इतर अनुषंगीक कामे क्रीडा संकुल समितीच्या शिल्लक निधीमधून करण्यात येणार आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्हयांमध्ये शासनाच्या जागेवर वसतिगृह बांधण्याच्या प्रस्तावाबाबत

(४२) ११४००८ (०५-०४-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्हयांमध्ये वसतिगृह भाडयाने न घेता शासनाच्या जागेवर बांधण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०८-०५-२०१८) : (१), (२) व (३) सद्य:स्थितीत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना वसतिगृह निर्वाह भत्ता योजना शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकीर्ण-२०१७/ प्र.क्र.४०७/तांशि-४, दिनांक २२/०२/२०१८ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामध्ये प्रतिविद्यार्थी प्रतिवर्ष शहरी भागांसाठी (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर इत्यादी) रुपये १०,०००/- व इतर शहरे / ग्रामीण भागासाठी रुपये ८०००/- निर्वाह भत्ता देण्यात येणार आहे.

राज्यातील आठ हजार शाळेचे संगणक लॅबबाबत

(४३) ११४११० (०६-०४-२०१८). श्री.विजय भांबळे (जिंतूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरातील काही निवडक शाळांना शासनातर्फे सहा ते सात वर्षापूर्वी लाखो रुपये खर्च करून संगणक लॅब दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास संगणक लॅब वर एकूण किती प्रशिक्षक किती वर्षाच्या कालावधीकरिता करारावर घेण्यात आले होते,

(३) असल्यास उक्त संपूर्ण लॅब सध्या संगणक प्रशिक्षकाच्या अभावामुळे विनावापर पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास संगणक प्रशिक्षकाचे पुर्ननियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करणत येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०५-०५-२०१८) : (१) केंद्र शासन पुरस्कृत ICT@school या योजनेंतर्गत राज्यात सन २००७-०८ पासून शासकीय व शासन अनुदानित शाळांना संगणक प्रयोगशाळा पुरविण्यात आल्या आहेत.

(२) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रत्येक टप्प्याचा कालावधी पाच वर्षे ठरवून देण्यात आलेला आहे. त्यानुसार योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी ई निविदेद्वारे निवडण्यात आलेल्या खाजगी संस्थेने संगणक निदेशकांच्या योजनेच्या पाच वर्षाच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्त्या केल्या होत्या.

(३) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार योजनेचा पाच वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर संगणक प्रयोगशाळा संबंधित शाळेस हस्तांतरित करण्यात आल्या आहेत.

(४) संगणक निदेशकांच्या नियुक्त्या खाजगी संस्थांमार्फत कंत्राटी तत्त्वावर मर्यादित कालावधीसाठी करण्यात आल्या होत्या.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर आणि वर्धा जिल्यातील शाळेत आर टी ई २५ टक्के अंतर्गत प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांकडून नियमबाहय फी वसूल केल्याबाबत

(४४) ११४१५७ (०६-०४-२०१८). श्री.सुनिल केदार (सावनेर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोमलवाडा आणि कोराडी (जि.नागपूर) रोड येथे असलेल्या नारायणा महाविद्यालय तसेच वर्धा जिल्यातील गांधी सिटी पब्लीक स्कूल या शाळेत आर. टी. ई. २५ टक्के कोटी अंतर्गत सन २०१६-१७ व २०१७-१८ या वर्षात मोजक्याच विद्यार्थ्यांना प्रवेश देवून पावती न देता नियमबाहय फी वसूल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दोन्ही शाळेत आर टी ई २५ टक्के कोटा अंतर्गत सन २०१६-१७ व २०१७-१८ या वर्षात किती विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आले आहे व त्याचा तपशिल काय आहे,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, त्यात काय आढळून आले, व त्यानुसार सदर प्रकरणी संबधितावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०५-०५-२०१८) : (१) हे खरे नाही.

(२) नारायणा महाविद्यालय सोमलवाडा, नागपूर तसेच कोराडी (जि.नागपूर) या शाळा अल्पसंख्याक आहेत. शिक्षण हक्क कायदा, २००९ अन्वये २५ टक्के प्रवेश हे अल्पसंख्याक शाळांना लागू नाहीत.

वर्धा जिल्हयातील गांधी सिटी पब्लिक स्कूल सिंदी मेघे येथे आरटीई २५ टक्के अंतर्गत खालीलप्रमाणे प्रवेश देण्यात आले आहेत.

वर्ष	नर्सरी	
	जागा	दिलेले प्रवेश
२०१६-१७	१३	३
२०१७-१८	२०	२०

वर्धा जिल्हयातील गांधी सिटी पब्लिक स्कूल, पुलगांव येथे आरटीई २५ टक्के अंतर्गत खालीलप्रमाणे प्रवेश देण्यात आले आहेत.

वर्ष	१ ली	
	जागा	दिलेले प्रवेश
२०१६-१७	१०	८
२०१७-१८	२०	२०

(३) व ४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा कार्यान्वीत न झाल्याबाबत

(४५) ११४८८४ (०६-०४-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माहिती संप्रेक्षण व तंत्रज्ञान (आयसीटी) योजना टप्पा ४ व टप्पा ५ करीता १५०० शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा सुरु करण्याबाबत केंद्र शासनाने मान्यता दिलेली आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मान्यता मिळाल्यानंतर निव्वळ निविदा अभावी संगणक प्रयोगशाळा अद्याप कार्यान्वीत होऊ शकल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संगणक प्रयोगशाळा लवकरात लवकर कार्यान्वीत होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०५-०५-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) एकूण ३ झोनपैकी झोन क्र.२ ची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. निवड झालेल्या निविदाकारास कार्यारंभ आदेश देण्याची प्रक्रिया सुरु आहे. झोन क्र.१ व झोन क्र.३ ची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुक्ताईनगर (जि.जळगांव) येथील मंजूर अल्पसंख्यांक विभागाचे शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय कार्यान्वित करण्याबाबत

(४६) ११५०३४ (०५-०४-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर, (जि.जळगांव) येथे अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी सन २०१५ मध्ये शासकीय तंत्रनिकेतन मंजूर करण्यात आले असून संचालक, तंत्रशिक्षण यांनी पी.एल.ए. मधून १० कोटी रुपये देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास मंजुरी देऊन सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात तरतूद करण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधीनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रस्ताव मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२९-०५-२०१८) : (१) होय.
(२) होय.
(३) माहे मार्च, २०१८ अखेर पर्यंत शासनाने एकत्रित निधीतून (Budgetary provision) सदर शासकीय तंत्रनिकेतन इमारत बांधकामाकरिता एकूण रू.१३.२० कोटी निधी उपलब्ध करून दिला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

तंत्रशिक्षण महाविद्यालयांतील प्राध्यापकांचे वेतन थकल्याबाबत

(४७) ११५१३२ (०५-०४-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तंत्रशिक्षण महाविद्यालयांतील प्राध्यापकांचे वेतन थकल्याबाबत सातत्याने येणा-या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर तंत्रशिक्षण संचालनालयाने महाविद्यालयांवर कारवाईकरण्याचा इशारा दिल्याचे माहे फेब्रुवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार किती महाविद्यालयांनी प्राध्यापकांचे वेतन थकविले आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार वेतन थकविणा-या महाविद्यालयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०५-०५-२०१८) : (१) होय.
(२) प्राध्यापकांचे वेतन थकीत असल्याबाबत एकूण पाच संस्थांतर्गत असलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयांसंदर्भात तंत्र शिक्षण संचालनालयास तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

१) सिंहगड एज्युकेशन सोसायटी, पुणे २) डी. वाय. पाटील इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, आकुर्डी आणि कसबा बावडा ३) राजीव गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग रिसर्च ॲण्ड टेक्नॉलॉजी, चंद्रपूर ४) मनोहर भाई पटेल इन्स्टिटयुट ऑफ इंजिनिअरिंग, टेक्नॉलॉजी, गोंदिया ५) तासगावकर एज्युकेशन सोसायटी, कर्जत, जि. रायगड.

(३) प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने संबंधित विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण यांच्या स्तरावर चौकशी समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. त्यापैकी १) सिंहगड एज्युकेशन सोसायटी, पुणे व २) यादवराव तासगावकर एज्युकेशन सोसायटी, कर्जत,जि.रायगड या दोन संस्थांतर्गत असलेल्या महाविद्यालयांकडून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली या शिखर संस्थेव्दारे शैक्षणिक वर्ष सन २०१८-१९ करिता प्रसिध्द करण्यात आलेल्या Approval Process Handbook नुसार विहीत करण्यात आलेल्या वेतनविषयक निकषाचे उल्लंघन झाल्याबाबतचा अहवाल प्राप्त झाला आहे. कोणत्याही व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांविरूध्द कारवाई करण्याचा अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली या शिखर संस्थेस आहे. त्यानुषंगाने सदर दोन संस्थांविरूध्द कारवाई करण्याबाबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना कळविण्यात आले असून पुढील कार्यवाही अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या स्तरावर सुरू आहे. उर्वरित ३ संस्थांविरुध्दचे चौकशी अहवाल अद्याप अप्राप्त आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात शिक्षक भरतीसाठी टीईटी अनिवार्य असतानाच अभियोग्यता आणि बुध्दिमता चाचणी अनिवार्य करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला असल्याबाबत

(४८) ११५१७५ (०६-०४-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षक भरतीसाठी टीईटी अनिवार्य असतानाच आता अभियोग्यता आणि बुध्दिमता चाचणी अनिवार्य करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला असल्याचे दिनांक २ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टीईटी परीक्षा नियमितपणे सुरु असून आतापर्यंत साडेसोळा लाख उमेदवारानी ही परिक्षी दिली असून या परिक्षेतून कोटयावधी रुपयांचे शुल्क शासनाने जमविले परंतु एकाही उमेदवाराला नोकरी दिली गेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शिक्षकांची नियुक्ती तर नाहीत पण पात्रता परीक्षेवरुन शासन उमेदवारांची आर्थिक फसवणूक करीत असल्याचे वास्तव समोर येत असूनही अभियोग्यता व बुध्दिमता चाचण्यांची नव्याने भर टाकून त्यातून आर्थिक कमाई करण्याचा प्रयत्न करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ९ लाख डी.एड तर ६ लाख बी.एड धारक शिक्षक बेरोजगार असताना या नव्या प्रक्रियेमुळे पात्रता परीक्षार्थींना शिक्षकांची नियुक्ती मिळणार आहे काय,

(५) उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२५-०५-२०१८) : (१), (२), (३) व (४) राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांसह खाजगी व्यवस्थापनाच्या अनुदानित, अंशत: अनुदानित व अनुदानास पात्र घोषित केलेल्या प्राथमिक,उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षण सेवकांच्या रिक्त पदावर भरती करताना सर्व उमेदवारांना निवडीची समान संधी मिळावी व शिक्षण सेवक पदासाठी उच्च गुणवत्ताधारक उमेदवाराची निवड होण्याच्या दृष्टीने शिक्षकाची रिक्त पदे अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणीतील गुणांच्या आधारे "पवित्र" या संगणकीय प्रणाली मार्फत भरण्याबाबतचा शासन निर्णय दि.२३.६.२०१७ रोजी पारित केलेला आहे.

माहे डिसेंबर, २०१७ मध्ये अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी परीक्षा घेण्यात आलेली आहे. "पवित्र" या संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून सदर भरती प्रक्रीया रिक्त पदांचा आढावा घेवून सुरु करण्यात येत आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

वसई येथील विद्यावर्धिनी इंजिनीअरींग कॉलेजसह अनेक कॉलेज ऑनलाइन प्रक्रियेत विद्यार्थ्यांचे नाव गुणवत्ता यादीत येवूनही प्रवेश नाकारल्याबाबत.

(४९) ११५३९५ (०५-०४-२०१८). श्री.नारायण कुचे (बदनापूर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई येथील विद्यावर्धिनी इंजिनीअरींग कॉलेजसह अनेक कॉलेज ऑनलाइन प्रक्रियेत अर्थात 'कट'ऑफ मध्ये विद्यार्थ्यांचे नाव गुणवत्ता यादीत आले तरीही त्यांना काही ना काही कारणे देऊन प्रवेश नाकारत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसई येथील विद्यावर्धिनी इंजिनीअरींग कॉलेजने माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा दरम्यान कट ऑफ यादीमध्ये पहिल्या क्रमांकावर आलेल्या मकंरद जवागेकर या मुलाला प्रवेश नाकारल्यामुळे त्यांनी याप्रकरणी कॉलेज प्रशासन तसेच तंत्रशिक्षण संचालनालय यांचेकडे लेखी तक्रार केल्यानुसार तंत्रशिक्षण विभागाच्या सहसंचालकांनी केलेल्या चौकशीत कॉलेजची प्रवेशप्रक्रिया संदोष आढळली असून याबाबत कॉलेजवर दंडात्मक कारवाई करण्याची शिफारस करत त्या बाबतचा अहवाल संचालक तंत्र शिक्षण संचालनालयाकडे सादर केला आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालयाकडून चौकशी अहवाल सादर होऊन २ महिने उलटूनही कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हेही खरे आहे काय
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त कॉलेजवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०८-०५-२०१८) : (१) नाही.

(२) शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबत विद्यावर्धिनी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, वसई या संस्थेमार्फत संस्थास्तरावर करण्यात आलेल्या प्रवेश पध्दतीच्या अनुषंगाने श्री.मकरंद जवळगेकर यांनी संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई यांच्याकडे तक्रार केली होती. त्याबाबत संचालक, तंत्र शिक्षण यांनी सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई यांच्यामार्फत चौकशी केली. त्यामध्ये कॉलेजची संस्था- स्तरावरील प्रवेश प्रक्रिया सदोष आढळल्याचा अहवाल संचालक, तंत्र शिक्षण यांना प्राप्त झाला आहे.

(३) नाही.

(४) संचालक, तंत्र शिक्षण यांनी सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,मुंबई यांच्या अहवालानुसार सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांना सदर संस्थेविरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्याबाबत प्रस्तावित केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

अल्पसंख्याक विभागाच्या वतीने(जि.सोलापूर) शासकीय तंत्रनिकेतनच्या आवारात मुलींसाठी १०० खाटांचे वसतीगृहाच्या बांधकामाबाबत

(५०) ११५४९० (०५-०४-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अल्पसंख्याक विभागाच्या वतीने (जि.सोलापूर) शासकीय तंत्रनिकेतनच्या आवारात मुलींसाठी १०० खाटांचे वसतीगृह बांधण्यात आले असून या बांधकामाची तपासणी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी उपजिल्हाधिकारी यांना माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा दरम्यान दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त इमारतीच्या बांधकामाची तपासणी पूर्ण झाली आहे काय, व त्याचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार उक्त निकृष्ट बांधकामात दोषी आढळलेल्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२९-०५-२०१८) : (१) नाही.

(२) व (३) सदर इमारतीच्या बांधकामाची कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांनी तपासणी केली असून त्यांनी सादर केलेल्या अहवालात इमारतीच्या बांधकामाच्या गुणवत्तेबद्दल कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. इमारतीचे बांधकाम सुरू असताना व नंतर दक्षता व गुणनियंत्रण मंडळ पुणे या कार्यालयाने इमारतीच्या दर्जाबाबत कोणताही आक्षेप नोंदविला नाही. वसतिगृहात विद्यार्थीनींकरिता उपलब्ध असलेल्या सोई-

सुविधांची तपासणी करण्याबाबत जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी उपविभागीय अधिकारी, सोलापूर क्र.२ यांना आदेश दिले होते. उपविभागीय अधिकारी, सोलापूर क्र.२ यांनी सादर केलेल्या अहवालानुसार इमारतीतील विद्यार्थीनींकरिता सोई-सुविधा व्यवस्थित असल्याचे दिसून येत आहे. तसेच उर्वरित सोई-सुविधा पुरविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.